# धर्म, अध्यात्म आणि पुरुषार्थ

चन्द्रशेखर पुरन्दरे

प्रस्तावना

धर्म, अध्यात्म आणि पुरुषार्थ यातील कोणत्याही संज्ञेची सर्वमान्य व्याख्या दिसत नाही. त्यामुळे या संकल्पना 'सगळ्यांनाच माहिती' असतात अशा अस्थिर गृहीतावर लेख आधारित आहे. तरी लेखाच्या सोयीसाठी प्रामुख्याने भगवद्‌गीतेचा आधार घेतला आहे. पहिल्या दोन संकल्पना आणि पुरुषार्थ यांचा संबंध तपासणे हा लेखाचा उद्देश आहे.

या संकल्पनांच्या अभ्यासातील पहिली मिती म्हणजे पावित्र्य. दर्कहाइम या फ्रेंच तत्त्वज्ञाच्या मते पावित्र्याची समाजाची समजूत मूलगामी असते. सत्य/असत्य, बरे/वाईट यांच्यापेक्षा पवित्र/अपवित्र हे द्वंद्व खोल असते. पावित्र्याला धक्का हा समाजासाठी धोका समजला जातो. पवित्र काय ते बहुधा धर्म ठरवतो. त्याअनुषंगाने अध्यात्माचा रोख मानवी जीवन पवित्र करण्याकडे असतो तर पुरुषार्थ (बहुधा) धर्माने सांगितलेल्या पवित्र गोष्टी प्रत्यक्षात आणायचा प्रयत्न करतो असे म्हणता यावे.

दुसऱ्या प्रकारेही या त्रयीकडे पाहता येईल. धर्म ही निश्चितच सार्वजनिक संकल्पना आहे. अध्यात्म तितके सार्वजनिक दिसत नाही. एखाद्या आध्यात्मिक गुरूचे अनेक अनुयायी (साधक!) असतीलही पण अध्यात्म मूलतः वैयक्तिक रहाते. पुरुषार्थ सार्वजनिक संस्कारांनी घडवलेला व्यक्तिनिष्ठ पण सामाजिक आविष्कार रहातो. म्हणजे तिन्हीचे अवकाश वेगवेगळे दिसते.

ऐतिहासिकता या तिसऱ्या अक्षावर धर्म आणि अध्यात्म या प्राचीन व काळानुसार अल्पांशी बदललेल्या संकल्पना दिसतात तर पुरुषार्थ त्यामानाने कालावलंबित लवचिक संकल्पना दिसते.

बहुतेक धर्मात धर्म आणि अध्यात्म यातील सीमा पुसट असतात. (शक्य आहे की, धर्मसंस्थापक समाजही बदलू पहातात आणि वैयक्तिक जीवनही) त्यामुळे इथपर्यंत धर्म, या रेषेपलीकडे अध्यात्म असे ठासून सांगता येत नाही. भगवद्‌गीतेच्या ओघावरून हे दिसून यावे. पण त्यामुळे अध्यात्मासाठी कोण 'धार्मिक' आणि विधी/उपचारांसाठी कोण 'धार्मिक' हे नक्की सांगता येत नाही.

**धर्म**

धर्माच्या अनेक व्याख्यांपैकी काही पाश्चात्य व्याख्या इथे पाहू. हिंदू धर्माचे विस्तृत विवेचन पुढे भगवद्गीतेच्या संदर्भात आहेच. वर दर्कहाइमचा उल्लेख आहे (१९-२० वे शतक). त्याच्या मते धर्म ही एकसंध रचना आहे. ती सामूहिक असते. पावित्र्याच्या संदर्भात धर्मात श्रद्धा आणि आचरण एकत्र येतात. पॉल टिलिश या विसाव्या शतकातील कॅथॉलिक तत्त्वज्ञाच्या मते धार्मिक श्रद्धा हा माणसाचा सर्वात अंतिम भाव (सर्वोच्च याअर्थी) असतो, तो संपूर्ण अस्तित्व व्यापतो आणि त्यापुढे दैनंदिन गोष्टी व्यर्थ दिसतात. स्टॅकहाउज या अलीकडच्या तत्त्वज्ञाच्या मते धर्म ही सर्वसमावेशक जीवनदृष्टी किंवा आध्यात्मिक व नैतिक दर्शन आहे. हे दर्शन अनुयायी श्रद्धेने मानतात कारण त्या दर्शनाचे सर्व आयाम पूर्णतः सिद्ध करता आले किंवा आले नाहीत तरी ते दर्शन स्वयंसिद्ध सत्य व न्याय्य मानले जाते. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या व्याख्येप्रमाणे अतिमानवी एक किंवा अनेक देव यांच्यावर विश्वास व त्यांची पूजा हा धर्म. केम्ब्रिज विद्यापीठाची व्याख्या जवळपास अशीच आहे. व्याख्यांची ही मोजकी उदाहरणे. त्या प्रत्येकीवर आणि इतरही सगळ्याच व्याख्यांवर बरीच टीका झालेली आहे. त्या खोलात जाण्याची जरुरी नाही. या सगळ्याचा विचार करून त्यातल्या त्यात समग्र व्याख्या स्टॅनफर्ड विद्यापीठाचा ज्ञानकोश देतो -

धर्म म्हणजे अंतिम, पवित्र अस्तित्वाशी संबंधित शिकवणुकी आणि आचार यांची सामूहिक, हस्तांतरणीय संरचना. तिच्याबद्दल आदर, विस्मय अपेक्षित असतात. ही संरचना अनुयायांचे त्या अंतिम अस्तित्वाशी नाते जोडते. हे नाते व्यक्तीला वाचवते, दिपवून टाकते आणि मुक्त करते. उपासना, विधिवत् ध्यानधारणा, पश्चात्ताप व स्वतःचे पुनरुज्जीवन या मार्गे ते नाते व्यक्तीचे जीवन आमूलाग्र बदलते.

अखेर तर धर्माची व्याख्याच करू नये हे मत पुढे आले.

**गीतेप्रमाणे संकल्पना**

भगवद्गीतेची सुरुवातच धर्म या शब्दाने होते. धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे... (धर्मक्षेत्रातील 'धर्मा'चे भाषांतर गीताईमध्ये विनोबा 'पवित्र' असे करतात.) अर्जुनविषादयोग या पहिल्या अध्यायात अर्जुन युद्धाबद्दल संशय व्यक्त करतो आणि होणारी हिंसा हा धर्म आहे का असे अनेकदा विचारतो. धर्म हा शब्द - धर्म, अधर्म, कुलधर्म, जातिधर्म - त्याच्या २१ श्लोकात सात वेळा येतो. पुढे दुसऱ्या अध्यायात मी धर्मसम्मूढचेताः - धर्माच्या बाबत संभ्रमित - आहे असे तो सांगतो आणि श्रेय काय ते निश्चितपणे सांग असे श्रीकृष्णाला म्हणतो. धर्माच्या संदिग्धतेचा हा प्रारंभ आहे. ही संदिग्धता आजही दिसते. अर्जुनाप्रमाणे व्यक्ती-अंतर्गत हे द्वंद्व चालू असते. मी हे कृत्य करतो आहे ते बरोबर का चूक, अंतिमतः ते धर्ममान्य आहे का (मग तो 'धर्म' निधर्मी विचारसरणीही असेल); एकाच धर्माच्या अनुयायांच्यात धार्मिक वचनांच्या पाठभेदानुसार - 'आमच्यांत उपवास गुरुवारी', 'आमच्यांत शनिवारी', 'आम्ही फक्त चतुर्थी'...; विभिन्न धर्मियांच्यात परस्परविरोधी श्रद्धांवर आधारित - शाकाहारी असावे का नसावे, डुकराचे मांस खावे का नाही, इत्यादी अनेक प्रकार.

दुसऱ्या अध्यायात धर्मयुद्धाखेरीज क्षत्रियांना काहीही श्रेयस्कर नाही असे श्रीकृष्ण स्वच्छ सांगतो. हे अर्जुनाच्या 'श्रेयस्कर काय' या प्रश्नाचे उत्तर मानता यावे, तसेच क्षत्रियाचा पुरुषार्थ काय हेही स्पष्ट होते. (श्रीकृष्णाच्या या भूमिकेवर गांधी, टागोर यांना संशय आलेला आहे. युक्तिवादाने किंवा दिव्यदर्शनानेही असेल पण देव कसा काय हिंसेचे समर्थन करतो?) अनुषंगाने श्रीकृष्ण स्वर्ग, भूलोकावरचे साम्राज्य किंवा दुष्कीर्ती असा पर्याय मांडतो. त्याबरोबरच सर्वश्रुत - आत्मा अमर आहे, तेव्हा तू या सम्मोहात पडू नको, आपले कर्म कर, तुझा अधिकार फक्त त्यावर आहे, पण फळावर आसक्ती नको, सुख-दुःख समान आहेत, त्यांच्यापासून अलिप्त रहा, इत्यादी. हे आध्यात्मिक विवेचन. त्यात स्थितप्रज्ञाची लक्षणेही येतात. 'विषयजनित सूखे सूख होणार नाही.'

पुढे कर्माची अपरिहार्यता येते. (गीतारहस्य. तो ग्रंथ गीतेनुसार कर्मयोग हा पुरुषार्थ आहे हे प्रतिपादन करतो). यज्ञाने देवांना संतुष्ट करा म्हणजे देव तुम्हाला संतुष्ट करतील हा प्रस्तावही आहे. पण यज्ञ म्हणजे अग्निकुंड, मंत्रोच्चार, आहुती असा वास्तव यज्ञ अभिप्रेत नसावा कारण चौथ्या अध्यायात ज्ञानयज्ञ सर्वश्रेष्ठ म्हटला आहे. त्या यज्ञात अज्ञान नष्ट होते. म्हणजे यज्ञ ही संज्ञा आध्यात्मिक, सांकेतिक असावी. कर्मसिद्धांत त्याच्या आकलनावर अवलंबून रहातो.थोडक्यात अनासक्त राहून कर्म करा, मी हे केले हा वृथाभिमान नको आणि आत्मरत रहा. तो स्वधर्म. त्यात मृत्यू परवडला पण परधर्म नको. (तिसरा अध्याय). हे विधान त्याचे ते, सुटे घेतले तर वर्णव्यवस्थेचे समर्थन करते, social mobility नाकारते असे आक्षेप शक्य आहेत आणि त्यात तथ्य आहे. सांगे शूद्रघरी आघवीं । पक्वान्नें आहाति बरवीं । ती द्विजें केविं सेवावीं। दुर्बळु जरी जाहला।। (श्री ज्ञानेश्वरी). म्हणजे द्विज कितीही दुर्बल झाला तरी शूद्राच्या घरी पक्वान्ने कसा खाईल? वरवर पहाता हा आदेश पर्यायी संदर्भचौकटी असू शकतात हे नाकारतो. पण स्वधर्म म्हणजे अनासक्ती मानली तर या विधानाची थोडी संगती लागते. धर्म म्हणजे काय याच्या व्याख्येखेरीज येथे अधिक खोलात जाणे कठीण दिसते.

सामान्यतः धार्मिक/आध्यात्मिक ग्रंथांचे हे वैशिष्ट्य असते. (आधीच्या अनेक लेखांत मी म्हटल्याप्रमाणे) अशा संदिग्ध वचनांनी निश्चित तत्त्व पुढे येत नाही. ती हेतुपुरस्सर संदिग्ध ठेवली आहेत का हा तत्कालीन शाब्दिक भाषेचा अपुरेपणा आहे हे सांगता येत नाही. (माझ्यामते दुसरी शक्यता). स्वधर्म समाजपराङ्मुखता शिकवतो असेही म्हणता येईल. त्यात विरोधाभासही आहे. तो शिकवणाऱ्यांना उपदेश तर अधिकाधिक श्रोत्यांना करायचा असतो!

परत गीतेकडे वळता, इंद्रिय-मन-बुद्धी-प्रभू अशी उतरंड आहे (तिसरा अध्याय). म्हणजे प्रभू सगळ्यात थोर आहे. त्याच्यापर्यंत पोचायचे असल्यास मोहाला दूर ठेवा हे तत्त्व आहे. मग चर्चा पुनर्जन्मावर येते. ती संकल्पनाही गीतेचा (आणि हिंदू धर्माचा) अविभाज्य भाग आहे. त्यानंतर कर्म, विकर्म आणि अकर्म यातील भेद स्पष्ट केला आहे (चौथा अध्याय). पंडित सातवळेकरांच्या मते - कर्म म्हणजे शास्त्रविहित कर्म. शास्त्राविरुद्ध कर्म म्हणजे विकर्म. अकर्म म्हणजे काहीच न करणे किंवा कर्म करणे पण त्यापासून अलिप्त रहाणे. त्यातही कर्म अकर्मात किंवा विकर्मात परिवर्तित होऊ शकते. हे परिवर्तन स्थलकाल ठरवतो. त्याची निश्चित व्याख्या करणे अशक्य आहे. तसेच कोणतेच कर्म निर्दोष नसते. तो दोष लागू नये म्हणून फलाशा सोडणे हा एकच मार्ग आहे. योगी कर्मात अकर्म पहातो व अकर्मात कर्म. हे पुन्हा कर्मापासून अलिप्त रहा सांगणे आहे. एकूण कर्मसिद्धांत सामान्यांच्या आवाक्यातला नाही असे दिसते. कारण मुळात कर्म ही अस्थिर, ओघवती संकल्पना आहे. काहीही केलंत तरी त्यात चूक रहाणारच.

पाचव्या आणि सहाव्या अध्यायांत योगी पुरुषाची लक्षणे आहेत. ती तशी सर्वविदित आहेत. योगी निरिच्छ, सगळ्या प्राणिमात्रांकडे एकाच दृष्टीने पाहणारा, अनासक्त, इत्यादी. योगी होणे हा गीतेनुसार सर्वोच्च पुरुषार्थ दिसतो. सहस्रांमध्ये एखाद्याला ती ओढ असते, त्यातील एखादाच त्या पदाला पोचतो (सातवा अध्याय). यावरून ती अवस्था जवळजवळ अप्राप्यच आहे हे भगवंत सांगतो. लेखासाठी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, पुरुषार्थाशी त्याचा संबंध. पुरुषार्थाचा रूढ संकेत क्रियेशी आहे. कोण काय करतो त्यावर त्याचा पुरुषार्थ ठरतो. योगी माणूस सकृद्दर्शनी निष्क्रिय आहे किंवा वर म्हटल्याप्रमाणे दुसऱ्या प्रकारचा अकर्मी. त्याचे कार्य आध्यात्मिक पातळीवर चालू असेलही. (आत्म्यास नित्य जोडावे, एकांती एकलेपणे - विनोबा). उदा. अरविंद घोष स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिशांविरुद्ध लढले, त्यांना अलीपूर बॉम्ब खटल्यात ब्रिटिशांनी तुरुंगातही टाकले. इहवादी दृष्टीने तोपर्यंत देशप्रेम हा पुरुषार्थ दिसतो. मग ते पाँडिचेरीला गेले व योगी झाले. त्यांचा भौतिक घडामोडींशी दृश्य सहभाग राहिला नाही.

सातवा अध्याय ज्याला शरण जायचे, त्या भगवंताचे रूप वर्णन करतो. हा धर्माचा भाग आहे. तो भाविकांसाठी आहे. त्यात अध्यात्म किंवा पुरुषार्थ दिसत नाही.

आठव्या अध्यायाच्या सुरुवातीला ब्रह्म, अध्यात्म आणि कर्म यांच्या व्याख्या येतात. ब्रह्म हे अविनाशी, परमश्रेष्ठ तत्त्व (ॐकार). त्याचा स्वभाव म्हणजे अध्यात्म. ते प्रत्येक प्राणिमात्रात असते. कर्म म्हणजे जग श्रेयस्कर दिशेने जाण्यासाठी प्रयत्न करणे - पंडित सातवळेकर. विनोबा कर्माचा आणखी व्यापक अर्थ देतात - 'भूत-सृष्टी जडे सारी तो जो व्यापार कर्म ते'.

यात दोन गोष्टी स्पष्ट होतात -

एक - अध्यात्म व्याख्येनेच व्यक्तिकेंद्रित आहे.

दोन - कर्म आणि पुरुषार्थ जोडलेले आहेत (विनोबांच्या नाही, पं. सातवळेकरांच्या भाष्यानुसार).

अंतकाळी माझे स्मरण केले तर दुःखद पुनर्जन्म टळेल असे आश्वासनही या अध्यायात आहे (ते विधान अक्षरशः घेऊ नये - योगी अरविंद). नंतर भगवंताच्या सर्वकालीन, सर्वव्यापी रूपाचे वर्णन, ते विश्वरूप दर्शवणे, अर्जुनाने त्याचा अधिकार मान्य करणे (९,१०, ११वे अध्याय).

चौदाव्या अध्यायात सत्त्व-रज-तम गुणांचे विवेचन आहे. हे त्रिगुण प्रकृतीतून येतात आणि माणसाला देहबद्ध करतात. त्यांची उतरंड स्पष्ट आहे. त्यातून इष्ट दिशेने पुरुषार्थ कसा असावा याचा तर्क करता येतो. (त्या मापदंडाने आजचे जग तमोगुणी दिसते! 'अज्ञान मोह दुर्लक्ष निघती ही तमातुनी' - विनोबा. पण ते एरवीही तसेच दिसले असते!) शेवटी या तिन्ही गुणांच्या वर जायचे आहे हा आग्रह आहे. या तीन 'गुणी' मंडळींचे आहार, आचार, विचार शेवटच्या दोन अध्यायांत (१७, १८) येतात.

त्याआधी सोळाव्या अध्यायात आसुरी वृत्तीचे वर्णन आहे. पावित्र्य, सदाचार, सत्यांश नसणारे लोक जग निराधार आहे, निरीश्वर आहे असे मानतात! ते जगाच्या विनाशासाठी निघालेले आहेत. परत, सदाचारी पण निरीश्वरवादी संदर्भचौकटच अमान्य दिसते. हा दृष्टिकोन मूलतत्ववादाचा होतो. मग ते हिंदू असोत, मुस्लिम असोत किंवा जर्मनीत, न्यूझीलंडमध्ये, ट्रम्पच्या अमेरिकेत हिंसाचार, नासधूस करणारे गोरे ख्रिश्चन.

महात्मा गांधींवरील एका लेखात मी मागे 'गांधी हे पॅकेजडील' आहे, ते सोयीस्कर तुकड्यात घेता येत नाही' असे म्हटले होते. (आज उपोषण करू, कालपासूनची निरीश्वरवादी चळवळ उद्यापासून पुन्हा चालू ठेवू...) ते निरीक्षण भगवद्‌गीतेबाबतही लागू दिसते. प्रथम श्रद्धा मग ब्रह्म, पुनर्जन्म, स्वर्ग/नरक, योगी, मामनुस्मर युध्य च आणि शेवटी मोक्ष - यावर आधारित ही रचना आहे. ती एकसंध आहे. हवा तो एखादा चिरा काढता येत नाही. एकूण धार्मिक ग्रंथांची रचना अशीच असते. ती विवाद्य वाटते.

**अध्यात्म**

वरती भगवद्‌गीतेनुसार अध्यात्माची कल्पना मांडली. योगी अरविंदांचे अध्यात्म त्याच धर्तीवर दिसते.

अध्यात्माच्या संदर्भात एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे ती म्हणजे पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेत तत्त्वज्ञानाचा जन्म प्रस्थापित धर्माला विरोध करण्यासाठी झाला असे मानले जाते. तेथे अध्यात्म ही तत्त्वज्ञानाची शाखा आहे. हा मुद्दा आपल्याकडच्या अध्यात्मालाही काही गुरूंबाबत लागू पडतो. त्यांच्या प्रवचनांमध्ये ते जन्मजात धर्माचा वारसा सांगत नाहीत हे लक्षणीय आहे - उदा. जे. कृष्णमूर्ती. प्रकाश दाखवण्यासाठी त्यांना प्रस्थापित धर्माची आवश्यकता भासली असे दिसत नाही. किंबहुना अडचणच होत असावी. ती अडचण बुद्धकाळापासून आहे. प्रस्थापिताला विरोध म्हणून बुद्धाने नवीन धर्मच स्थापन केला आणि मूलमध्यमककारिकेत नागार्जुनाने त्यावर आध्यात्मिक भाष्य केले. उदा.

सर्वं तथ्यं न वा तथ्यं तथ्यं चातथ्यमेव च ।

नैवातथ्यं नैव तथ्यं एतद् बुद्धानुशासनम् ।।

म्हणजे प्रत्येक गोष्ट आहे किंवा नाही; किंवा आहे आणि नाही; किंवा नाही (असे) नाही आणि आहे (असेही) नाही. हे बुद्धाचे अनुशासन आहे. कोणत्याही गोष्टीचा (अस्तित्वाबद्दलचा) तर्क निश्चितपणे करता येत नाही. हे बौद्ध अध्यात्माचे उदाहरण. ते हिंदू अध्यात्मापेक्षा निराळे आहे.

अध्यात्माकडे सामाजिक दृष्टीने पहाता, धर्म हे दैनंदिन जीवन जगण्याचे होकायंत्र दिसते. पण गुरुत्वाकर्षण म्हणून देवाची (किंवा अध्यात्माची) जरुरी असावी. मग उत्तर दिशा 'अधिकृतरीत्या' कळते. भूतकाळात निसर्गाची रूपे हे गूढ होते. म्हणून एक अधिभौतिक शक्ती हा त्याचा खुलासा होता. विज्ञानाच्या प्रगतीने नैसर्गिक गूढे बरीच कमी झाली. पण 'शक्ती' राहिली. त्याचबरोबर 'मी असेच का वागावे' हा प्रश्न वर्तमानकाळापेक्षा तेव्हा अधिक वारंवार उपस्थित होत असावा. त्यावेळी केवळ 'वडीलधारे सांगतात म्हणून', 'परंपरा म्हणून' यापेक्षा 'देव सांगतो' असे म्हणण्याने त्या आज्ञेला वजन येते. त्या सामूहिक विश्वासाने धर्मालाही वलय प्राप्त झाले. ते दैवी वलय मानवी बुद्धीच्या, आकलनाच्या पलीकडचे आहे हे बहुसंख्यांकांवर ठसवले गेले. यात ज्यांना साक्षात्कारासाठी वलय ठसवायची गरज पडली नाही, ते योगी/द्रष्टे यांच्याबद्दल औद्धत्य किंवा संशय नाही. लेखाचा आवाका अध्यात्माची सामाजिक प्रस्तुती पहाणे एवढाच आहे.

तात्पर्य, जी. ए. कुलकर्णींच्या (?) एका कथेत त्यांनी म्हटल्याप्रमाणे बहुसंख्य प्रवाहपतितांतून एखादा तीरावर जातो. (ते श्रीकृष्णही म्हणतो). अध्यात्माची पहुंच इतपतच दिसते. बृहत्समाजासाठी त्याची प्रस्तुती संशयास्पद आहे.

**पुरुषार्थ**

पुरुषार्थ ही परिवर्तनशील संकल्पना आहे.उदा. महाभारताच्या काळात दातृत्व ही पुरुषार्थाची एक महत्त्वाची कसोटी होती. (कर्ण). काळानुसार शारीरिक ताकद, धैर्य, बौद्धिक क्षमता, सहसंवेदना ही पुरुषार्थाची लक्षणे होत गेली. काही ऐतिहासिक पुरुषार्थांमागे तत्कालीन सततची युद्धपरिस्थिती,सामाजिक

असुरक्षितता ही पार्श्वभूमी असावी तर विज्ञान, तंत्रज्ञानाच्या विकासाने बौद्धिक क्षमता आणि सर्वग्रासी वर्धिष्णु उपभोक्तावादाने यस्यास्ति वित्तं... हे आजचे पुरुषार्थ.

संज्ञेतच पुरुषप्रधान संस्कृती उघड आहे. ती परंपरेने सांगितलेल्या चार पुरुषार्थातही दिसून येते. धर्म, अर्थ, काम, मोक्ष. पुरुषाच्या संदर्भात यांच्यामध्ये संघर्ष आलाच तर धर्म हे मूल्य महत्त्वाचे. या चतुष्टयीतील कोणते काय प्रमाणात स्त्रीला व्यक्ती म्हणून तेव्हा किंवा आजही उपलब्ध असतात हे प्रश्नचिन्ह आहे. उदा. जेव्हा एखादी स्त्री अंतराळवीर होते, तेव्हा ती 'बातमी' म्हणून येते. त्यातून स्त्री-पुरुष हे महदंतर उघड होते. शिक्षण आणि अर्थार्जन याबाबत निश्चितच स्त्रियांची प्रगती झाली आहे. पण त्याचवेळी विवाह हा संस्कार म्हणून स्त्री-जीवनाच्या केंद्रस्थानी (निदान भारतात तरी) अजून शाबूत आहे. चंगळवाद स्त्रियांमध्ये पुरुषांइतक्याच (कदाचित जास्त) वेगाने वाढत आहे. या दोन्हीचे उदाहरण म्हणजे नवश्रीमंतांत वाढत असलेले बीभत्स उधळपट्टीचे 'धार्मिक' लग्नसमारंभ. या आत्मप्रौढी, आत्मसंतुष्ट वर्गाचे समाजाच्या निम्न स्तरापासून वाढते तुटलेपणही बोचरे आहे. त्यांच्या काचेच्या राजवाड्यांच्या सुरक्षेच्या भिंती अधिकाधिक अभेद्य होत आहेत. फक्त ते आणि त्यांचे सगेसोयरे यांना प्रवेश. उदासीनतेवर इलाज नाही असे डॉ. आंबेडकर म्हणाले होते. ही मानसिकता बदलण्याची जबाबदारी सावित्रीबाईंच्या वंशजांवरही आहे, ती किंबहुना पुरुषांप्रेक्षा जास्त आहे. मग त्याला पुरुषार्थ म्हणा किंवा सक्षमार्थ म्हणा.

प्रस्तावनेत पुरुषार्थ व्यक्तिनिष्ठ तरी सामाजिक असा उल्लेख केला. अगदी घरगुती, कुटुंबांतर्गत 'पुरुषार्थात' किमान दोन व्यक्ती असतात. पुरुषार्थ गाजवणारा/री व तो मान्य करणारा/री. त्याअर्थी सामाजिक.

आता धार्मिक पुरुषार्थ पाहू. कोणत्याही प्रस्थापित धर्माबाबत एक गोष्ट कायम लक्षात ठेवायला हवी. ती म्हणजे धर्मग्रंथ काय म्हणतो आणि त्या धर्माचे लोक कसे वागतात या दोन भिन्न गोष्टी आहेत.

धर्मग्रंथ ही निश्चिती असते. त्याचा काळ, त्यातील लिखाण नक्की असते. सगळ्यात अलीकडचा धर्मग्रंथ कुराण. तो ६३२ साली अस्तित्वात आला. म्हणजे तोही १४०० वर्षांपूर्वीचा. हिंदू, ज्यू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन धर्म त्यापूर्वीचे. तदनंतर आजवर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. पारतंत्र्य, स्थलांतरे, नैसर्गिक प्रकोप, नवीन तंत्रज्ञान, वगैरेंमुळे लोकांचे वागणे बदलले.

काळानुसार बदलणे पोथीनिष्ठतेला मान्य नाही. सर्व प्रश्नांची उत्तरे वेदांत/ बायबलमध्ये/कुराणात सापडतील हा 'ऐतिहासिक' पण अनैतिहासिक दृष्टिकोन आहे. सामाजिक उत्क्रांती नाकारणारी ही अंधश्रद्धा आहे. पण ती घट्ट असते. मार्क्सवाद, भारतीय संविधान यांबद्दलही तसे म्हणता येईल, पण तो मुद्दा निराळा.

लोक कसे वागतात हा पुढचा प्रश्न गहन आहे, लोक तसेच का वागतात हा आणखीच गहन प्रश्न. लोक तसेच का वागले याचे उत्तर प्रश्न कोणाला विचारला त्याच्या भूमिकेवर अवलंबून असते. ते एकमेव, निश्चित, वस्तुनिष्ठ असू शकत नाही. उदा. एखाद्या दंगलीला जबाबदार कोण याची अनेक उत्तरे येतील - विरोधी पक्ष, 'ती' जमात, बेकारी, सोशल मीडियावरील अपप्रचार इत्यादी. ते बहुधा तर्क असतात.

लोक कसे वागतात हे आपल्यापर्यंत मीडिया पोचवतो. त्याचे पूर्वग्रह या सादरीकरणात येतात. तत्कालीन घटनेवर मीडियातील क्षणिक तज्ज्ञ वेळोवेळी तारे तोडतात. बहुशः त्याचा परिणाम लोक कसे वागतात आणि लोक तसेच का वागतात या दोन्ही प्रश्नांबाबत गोंधळ मात्र निर्माण करण्यात होतो.

लोक कसे वागले याची उदाहरणे अनेक आहेत. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर '८४ सालचे दिल्लीत हिंदूंनी केलेले शिखांचे हत्याकांड आणि' मोठा वृक्ष पडला की पृथ्वी हादरते' हे राजीव गांधींचे त्यावरचे उद्गार; २००२ मधील गुजरात - आधी कारसेवकांची हत्या, नंतरचे दंगे व मुस्लिमांचे शिरकाण; मियांमारमध्ये बौद्ध जनतेने व लष्कराने चालू ठेवलेला रोहिंग्या मुस्लिमांचा वंशच्छेद; कोरोना आणि तब्लिगी जमात यांचा अतिशायोक्त संबंध जुळवणे, गाईंची वाहतूक खाटकाकडे गोमांसासाठी केली जात आहे या संशयावरून संबंधितांची हत्या - हे सर्व धर्मोद्भव हिंसाचार. या विकृत पुरुषार्थांचा आणि त्या त्या धर्मग्रंथांचा काहीच संबंध दिसत नाही. ते पुढील मुस्लिम 'पुरुषार्था'वरूनही स्पष्ट होईल

पाकिस्तानात मध्यंतरी इंटरनेटवर कर्मठ इस्लामच्या दृष्टीने आक्षेपार्ह पोस्ट्स करणाऱ्या कंदील बलोच नावाच्या (खरे नाव - फौझिया आझमी) तरुणीची तिच्या भावाने घरात हत्या केली. 'ती कुटुंबाला लांच्छन आहे, ती धर्माचा अपमान करते' या कारणावरून. या 'पुरुषार्थाला' लोकमान्यताही मिळाली. तोच प्रकार त्याआधी पाकिस्तानच्या पंजाब प्रांताच्या गव्हर्नरच्या हत्येत दिसून आला. तो गव्हर्नर एका गरीब शेतमजूर ख्रिश्चन स्त्रीला 'इस्लामचा अपमान केला' या तथाकथित आरोपावरून वाचवायला पहात होता. त्याच्या खुन्याला फाशी झाली आणि त्याचे (खुन्याचे) थडगे हे तीर्थस्थान झाले आहे. (त्या स्त्रीला नंतर कॅनडामध्ये आश्रय मिळाला.) सौदी अरेबिया, पाकिस्तान, अफगाणिस्तानांत कुटुंबाच्या संमतीविरुद्ध मुलीने प्रेमविवाह केला तर खानदानाची इज्जत वाचवण्यासाठी honour killing ची प्रथा आहे. म्हणजे तिचा धर्ममान्य खून करायचा.

सीरियन हत्याकांडात याझिदी नावाच्या अमुस्लिम

अल्पसंख्यांक लोकांवर अनन्वित अत्याचार झाले. तेव्हा याझिदी मुलीवर बलात्कार करण्याआधी आणि नंतर इस्लामिक स्टेटचे मुस्लिम धर्मसैनिक देवाची प्रार्थना करत कारण हे धर्मकृत्य होते. (अशा एका बलात्कारपीडितेला - नादिया मुरादला -अशा अत्याचारांविरुद्ध कार्य करण्याबद्दल २०१८ चा नोबेल पुरस्कार मिळाला.) स्टेटच्या सैनिकांनी जॉर्डन देशाच्या एका युद्धकैदी वैमानिकाला लोखंडी पिंजऱ्यात बसवून जिवंत जाळले होते. हे 'धर्मयोद्धे' पकडलेल्या, पळवलेल्या पाश्चात्य गोऱ्या वार्ताहरांचा सार्वजनिक शिरच्छेदही करत आणि या व्हिडिओंमार्फत प्रचार करत. (मी हे व्हिडिओ पाहिले आहेत). इस्लाममध्ये पुरुषार्थ या शब्दात नसेल पण समर्थकांच्या मते हा धर्ममान्य पुरुषार्थच. आणि त्यांची संख्या दुर्लक्षणीय नाही.

दुसऱ्या बाजूला 'या लोकांना खरा इस्लाम कळलाच नाही' हे मतही आहे. दुर्लक्षित, असमर्थ व मूक मुस्लिम या मताचे. त्यांची संख्या अज्ञेय.

अशा हिंसाचारी वृत्तींना, मग त्या कोणत्याही धर्माच्या किंवा धर्माच्या नावाखाली असोत, बहिष्कृत व अप्रस्तुत कसे करायचे हे चळवळींना शोधावे लागेल. आज जीवाची भीती किंवा सरकारची अक्षमता ही प्रमुख कारणे दिली जातात. ती अपुरीच नाहीत तर समाजविघातकही आहेत. ही कारणे स्वीकारणे आणि हिंसाचार बघत रहाणे हा २१व्या शतकातील मानवी पराभव आहे.

**पर्यायी विचार**

पुरोगामी विचार म्हणजे 'आम्हाला धर्म/अध्यात्म मान्य नाही' असा अभिनिवेश पाहिजे, तसा उद्घोषही केला पाहिजे असे समीकरण दिसते. वस्तुतः तसा दावा करणे म्हणजे बहुसंख्यांकांची पुरोगामित्वाबाबत परात्मता वाढवणे आहे आणि उजव्या शक्ती अधिक उजवीकडे ढकलणे आहे. अधिक महत्त्वाचे म्हणजे या भूमिकेची 'शेवटच्या माणसाची' परिस्थिती सुधारण्यासाठी जरुरीही दिसत नाही. प्रचंड लोकसंख्या जेथे श्रद्धाळू आहे, त्या लोकांच्यात जर काम करायचे असेल तर धोरण म्हणून श्रद्धेचे वास्तव स्वीकारावे लागेल. 'देवाला रिटायर करा' हा उपदेश चळवळीला उपयोगी नाही. साठहून अधिक वर्षांच्या कडक साम्यवादी धर्मविरोधी काळातही रशियन चर्च टिकून राहिले आणि साम्यवादाच्या अस्तानंतर फोफावले. श्रद्धा मान्य करण्यासाठी पुरोगामी कार्यकर्त्याला व्यक्तिशः ती स्वीकारणे आवश्यकही वाटत नाही. पण त्यासाठी ज्या कोणत्या आदर्शवादी भुयारात ते आहेत, तेथून बाहेर यावे लागेल. हे काम तळागाळातच होऊ शकते - वस्ती, फारतर एखादे गाव. जसे डॉ. दाभोळकरांनी, अण्णांनी, किंवा मोहनभाईंनी (लेखा-मेंढा) केले. तालुका, जिल्हा, राज्य, देश या स्तरावरच्या आदर्शवादांचा काळ गेला.

आज जे पुरोगामी-प्रतिगामी द्वंद्व उभे राहिले आहे, ते समाजाच्या दृष्टीने हितकारक नाही.

संवादाचे उदाहरण 'प्रतिगामी' शिक्का असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दिले आहे. त्यांनी दिवंगत माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांना त्यांच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. त्या समारंभाने दोन्ही बाजू निदान एका व्यासपीठावर आल्या. विशेष म्हणजे हा पुढाकार संघाने घेतला! 'पुरोगाम्यांनी' नाही. ते मुखर्जींवर फक्त टीका करत राहिले!

**वर्तमान घडामोडी व या संकल्पना**

जोपर्यंत सामाजिक विषमता; धार्मिक, पंथीय वैरे पारंपरिक चौकटीत बसत होती तोपर्यंत या संकल्पनांची प्रस्तुती होती. पण कोरोनाच्या जागतिक संकटाने ती चौकटच खिळखिळी केली. आज मानवी बुद्धी या आघाताने सुन्न झाली आहे. एखादी लस निघेलही. पण परत व्यवहार मूळ पदावर आले नाहीत तर तंत्रज्ञान, मानवी धूर्तता व स्वार्थ नवे पावित्र्य, नवीन प्रथा, नवे अध्यात्म आणि नवे पुरुषार्थ निर्माण करतील असे ऐतिहासिक कर्तृत्वावरून दिसते. आताच सफाई कर्मचारी, पोलीस, वैद्यकीय कर्मचारी 'कोरोना योद्धे' झाले आहेत. हा नवीन पुरुषार्थ. तर मोठ्या मंचावर चीनमध्ये आणि भारतात राष्ट्र-राज्य कोरोनाच्या संधीने अधिक दमनकारी होताना दिसत आहे.

लेख लिहिण्याच्या वेळची (सप्टेंबर पहिला आठवडा) दुसरी शक्यता म्हणजे चीन-भारत तणाव. त्याने युद्ध झालेच तर ज्ञात प्रवाह सुरु होतील. गेले बरेच महिने Zee आणि ABP चॅनल्स पाकिस्तान-चीनविरोधी वातावरणनिर्मिती करत आहेतच. युद्धाने सैन्य हे पुरुषार्थाचे (परत) प्रतीक होईल, रूढ धर्म परत जोर घेईल. जोडीला देशधर्माच्या ज्वरात खरे प्राधान्य असणारे दारिद्र्यनिर्मूलनासारखे कार्यक्रम दुर्लक्षिले जातील. या वर्षीच कोरोनामुळे राष्ट्रीय उत्पन्न एप्रिल-जून तिमाहीत २४ टक्क्यांनी घटले व दारिद्र्याचा प्रश्न आणखीच तीव्र होत आहे. त्याचे अदृश्य बळी नेहमीप्रमाणे सर्वहारा, विशेषतः त्यांतील स्त्रिया व मुले असतील. त्यांच्यासाठी धर्म, अध्यात्म, पुरुषार्थ कोणीही धावून येणार नाही.

**निरीक्षण**

एकूण चित्र पहाता ग्रांथिक धर्म कालबाह्य म्हणून आणि अध्यात्म व्यक्तिकेंद्रित म्हणून सामाजिकदृष्ट्या अप्रस्तुत वाटतात. तर धर्माच्या नावाखालचा पुरुषार्थ समाजाला घातक दिसतो. भूतकाळात अडकून पडलेल्या या सामूहिक मानसिकतेचा पगडा कसा कमी करायचा, तुटेपर्यंत न ताणता जनमत श्रेयस्कर सामाजिक दिशेला कसे न्यायचे हे चळवळींना आव्हान आहे.

*https://purandarearts.com/*
*http://www.art-non-deco.com/*
*artnondeco@yahoo.co.uk*

*चन्द्रशेखर पुरन्दरे*

Paintings used in the article

आठवणी [down the memory lane]



संभ्रमित [gridlock]



फ्लॅशबॅक [flashback]

